**स्मरणपत्र**

# मुंबई विद्यापीठ

शैक्षणिक नियुक्त्या व गुणवत्ता हमी
(सांख्यिकी कक्ष)

दुरध्वनी क्र. ०२२-६८३२ ००५२

Email : supt.statunit@gmail.com

खोली क्र. २०२, दुसरा मजला,
मुंबई विद्यापीठ, फोर्ट,
महात्मा गांधी मार्ग,
मुंबई- ४०० ०३२.

**No. AAQA/ICD/2022-23/1196 of 2022**

दिनांक : १४ नोव्हेंबर, २०२२

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या वर्षाकरीता ऑनलाईन विद्यार्थी संख्या बाबतची (Student on Roll - https://eoffice.mu.ac.in/STATISTICAL) माहिती नोंदविणेबाबत.**

**संदर्भ : या विभागाचे No. UDSTAT/ICD/2022-23/ 1035 of 2022, दिनांक ६ ऑक्टोबर, २०२२ रोजीचे परीपत्रक.**

---

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भीय परिपत्रकाच्या अनुषंगाने आपल्या असे निदर्शनास आणून देवू इच्छितो की, सदर विभागामार्फत **शैक्षणिक वर्ष २०२२-२३** या वर्षाची **Student on Roll** बाबतची माहिती **https://eoffice.mu.ac.in/STATISTICAL** या वेबपोर्टवर ऑनलाईन स्वरूपी नोंदविण्याबाबत कळविण्यात आलेले होते. परंतु अद्यापर्यंत आपल्यामार्फत सदरची माहिती ऑनलाईन स्वरूपी पोर्टलवर भरण्यात आलेली नाही.

सदरची ऑनलाईन माहिती ही विद्यापीठास माहितीपुर्ण धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आणि शिक्षण क्षेत्राच्या विकासाकरीता संशोधन करण्यासाठी उपयुक्त असते. तसेच केंद्र शासन व महाराष्ट्र शासन यांच्या विविध प्राधिकरणांना/विभागांना व माहितीचा अधिकार, २००५ व इतर यांना पाठविणे महत्वाचे असल्याकारणाने ती माहिती आपल्यामार्फत ऑनलाईन स्वरूपी सादर करणे अत्यंत आवश्यक बाब आहे.

प्रती शैक्षणिक वर्षानुसार **Student on Roll** बाबतची माहिती ऑनलाईन स्वरूपी मागविली जाते. परंतु काही वेळेस आपल्या विद्यापीठ विभाग, महाविद्यालय/संस्थेकडून अनेक माध्यमांद्वारे (परिपत्रक, दुरध्वनी व ईमेलद्वारे) अवगत करूनसुध्दा माहिती दिलेल्या वेळेत सादर केली जात नाही, याची आपण विभाग प्रमुख, प्राचार्य/संचालक या नात्याने योग्य ती दखल घेवून उल्लेखित केलेली माहिती विनाविलंब सादर करण्याविषयी संबंधित कर्मचारी वर्गास सूचित करण्यात यावे. **त्याचप्रमाणे आपले विद्यापीठ विभाग, महाविद्यालय/संस्था यांची उर्वरीत शैक्षणिक प्रवेश प्रक्रीया शिल्लक असल्यास, अशी बाब वगळता इतर पुर्ण असलेली माहिती वेबपोर्टलवर उपलब्ध असलेल्या विवरण पत्रानुसार सोमवार, दिनांक २८ नोव्हेबर, २०२२ पुर्वी ऑनलाईन स्वरूपी भरण्यात यावी.**

तसेच ऑनलाईन स्वरूपातील माहिती भरण्यास काही समस्या/अडथळा उद्भवल्यास परिपत्रकामध्ये नमुद केलेल्या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधून शंकेचे निरसन करून घ्यावे व त्याचप्रमाणे आवश्यक ऑनलाईन (AISHE, MIS व Students on Roll बाबतची) माहिती पुर्ण भरून झाल्यानंतरचे हमीपत्र/प्रमाणपत्र मुंबई विद्यापीठ, शैक्षणिक नियुक्त्या व गुणवत्ता हमी (सांख्यिकी कक्ष), खोली क्र. २०२, दुसरा मजला, फोर्ट, यांचेकडून घेण्यात यावे.

(प्रा. शैलेंद्र देवळाणकर)
प्रभारी कुलसचिव

Scanned with CamScanner